आजचे पंचांग

सोमवार दि. २३ फेब्रुवारी २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण वसंत ऋतु, फाल्गुन मास, शुक्लपक्ष, षष्ठी सकाळी ९-१० पर्यंत नंतर सप्तमी मंगळवारच्या सकाळी ७-०३ पर्यंत. दिवस नक्षत्र– भरणी संध्याकाळी ४-३४ पर्यंत

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

## पुण्याचा पारा चढला...

**पुणे** : शहरासह उपनगरात सलग तिसऱ्या दिवशी कमाल तापमानात झालेल्या वाढीमुळे उन्हाचा चटका चांगलाच जाणवत आहे. फेब्रुवारी महिन्यातील उच्चांकी कमाल तापमान नोंदीकडे वाटचाल असून, लोहगाव आणि कोरेगाव पार्क येथे शनिवारी (दि. २१) कमाल तापमान ३६ अंशापर्यंत पोहचले. या महिन्यात पहिल्यांदाच ३५ अंशाच्या पुढे कमाल तापमान गेले असून, उष्णतेचा पारा ३४ ते ३५ अंशाच्या पुढे नोंदविला आहे. वाढत्या तापमानामुळे थंडी गायब झाली आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 सोमवार, दि. २३ फेब्रुवारी, २०२६ वर्ष - १ अंक - १५१ पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### रशियाचा कीववर क्षेपणास्त्र हल्ला

**कीव :** रशियाने युक्रेनवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोनच्या हल्ल्यात कीव प्रदेशात एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची माहिती युक्रेनच्या आपत्कालीन सेवेने रविवारी दिली. उद्ध्वस्त इमारतींच्या ढिगाऱ्याखालून एका मुलासह आणखी आठ जणांना वाचवण्यात आले, असे सेवेने सांगितले. या हल्ल्यामुळे कीवच्या उपनगरातील पाच जिल्ह्यांमध्ये नुकसान झाले आणि आग लागली: ओबुखिव, ब्रोवरी, बोरिसपिल, बुचा आणि फास्टिव्ह. फास्टिव्ह जिल्ह्यातील पुट्रिवका गावात, आपत्कालीन प्रथम प्रतिसादकर्त्यांनी ढिगाऱ्याखाली दबलेल्या लोकांना वाचवण्याचे काम केले.

### वृद्ध महिलेची ३ कोटींची फसवणूक

**डेहराडून :** डेहराडूनमधील एका ७० वर्षीय महिलेला सायबर फसवणूक करणाऱ्यांनी ३ कोटी रुपयांपेक्षा जास्त रुपयांना गंडा घातल्याचा आरोप आहे. त्यांनी सीबीआय अधिकारी असल्याचे भासवून तिला 'डिजिटल अरेस्ट'मध्ये ठेवले होते, असे पोलिसांनी रविवारी सांगितले. महिलेच्या तक्रारीवरून शुक्रवारी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आणि तपास सुरू करण्यात आला आहे, असे त्यांनी सांगितले.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार

**गोंदिया :** महाराष्ट्रातील गोंदिया जिल्ह्यात रविवारी पहाटे राष्ट्रीय महामार्गावर एका अज्ञात वाहनाने धडक दिल्याने एका बिबट्याचा मृत्यू झाला, असे वन अधिकाऱ्यांनी सांगितले. ही घटना पहाटे १.३० च्या सुमारास सडक अर्जुनी वनपरिक्षेत्रांतर्गत असलेल्या नैनपूर-दुग्गीपार रोडवर राष्ट्रीय महामार्ग ५३ वर घडली, असे अधिकाऱ्याने सांगितले.

### ६ मार्चला राज्याचा अर्थसंकल्प, अजित पवारांची उणीव जाणवणार

# अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आज सुरुवात

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**मुंबई :** राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला २३ फेब्रुवारीपासून सुरुवात होत आहे. सन २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठीचा राज्याचा अर्थसंकल्प ६ मार्च रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यात येणार आहे. कनिष्ठ सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अर्थसंकल्प मांडतील, तर वरिष्ठ सभागृहात मंत्री आशिष जयस्वाल अर्थसंकल्प सादर करतील.

अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर विविध प्रश्नांवरून सरकारची कोंडी करण्याची रणनीती विरोधकांनी आखली आहे. दुसरीकडे, सत्ताधारी पक्षाकडूनही कामगिरी मांडत प्रतिउत्तर देण्याची तयारी सुरू आहे.

या अधिवेशनात काही मुद्दे विशेष गाजण्याची शक्यता आहे. माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाच्या दिवशीच अल्पसंख्याक संस्थांना प्रमाणपत्रांचे वाटप झाल्याचा वाद, मुलुंड येथील मेट्रो दुर्घटना, मंत्र्यांच्या दालनात उघडकीस आलेली लाचखोरी, तसेच मुस्लिम समाजाच्या पाच टक्के आरक्षणासंदर्भातील निर्णय या मुद्यांवर विरोधक सरकारला लक्ष्य करतील, अशी चिन्हे आहेत.

याशिवाय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील निकाल, महापौर निवडणूक आणि राज्यसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आघाडीत निर्माण झालेला अंतर्गत तणाव हे मुद्देही अधिवेशनात चर्चेत येऊ शकतात. त्यामुळे विरोधकांसाठीही ही राजकीय कसोटी ठरणार आहे.

या अधिवेशनात अजित पवार यांची उणीव प्रकर्षाने जाणवेल, अशी भावना व्यक्त होत आहे. गेली साडेतीन दशके त्यांनी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात सक्रिय भूमिका बजावली होती. राज्याचा अर्थसंकल्प तब्बल ११ वेळा त्यांनी मांडला होता. त्यांच्या अकाली निधनानंतर प्रथमच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अर्थसंकल्प सादर करणार आहेत.

अधिवेशनाची सुरुवात राज्यपालांच्या अभिभाषणाने होईल. त्यानंतर अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडण्यात येणार असून सदस्यांकडून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येईल. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा सभागृहाला परिचय करून देतील. अधिवेशनात राजकीय चढाओढ पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान, राज्यात फोफावलेल्या 'लव्ह जिहाद'च्या विळख्यातून हिंदू भगिनींची सुटका करण्यासाठी आणि धर्मांतराच्या कुटिल डावाला लगाम घालण्यासाठी महायुती सरकारने कंबर कसली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनातच 'लव्ह जिहादविरोधी कायदा' संमत करण्याच्या हालचालींना वेग आला असून, हिंदुत्ववादी संघटनांच्या मागणीची दखल घेत सरकार आता निर्णायक पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे.

## सत्ताधाऱ्यांच्या चहापानावर विरोधकांचा बहिष्कार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील शिवालय येथे महाविकास आघाडीची पत्रकार परिषद पार पडली. या बैठकीला मविआचे घटक पक्ष उपस्थित होते. मात्र शरद पवार गटातून एकही वरिष्ठ नेता उपस्थित नसल्याने विविध चर्चांना उधाण आले.

दरम्यान, सत्ताधाऱ्यांच्या चहापान कार्यक्रमावर विरोधकांनी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतल्याचे जाधव यांनी जाहीर केले. प्रचंड बहुमत मिळाल्यानंतर सरकारमध्ये गर्वाची भावना निर्माण झाली असून विरोधकांचा सन्मान राखला जात नाही, असा आरोप त्यांनी केला. लोकशाही आणि संविधानानुसार अपेक्षित वर्तन सत्ताधाऱ्यांकडून होत नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

बैठकीस काँग्रेसचे विजय वडेट्टीवार, सतेज पाटील, शिवसेनेचे आदित्य ठाकरे, भास्कर जाधव, अनिल परब आणि अमिन पटेल उपस्थित होते. राष्ट्रवादीच्या अनुपस्थितीमुळे महाविकास आघाडीत मतभेद निर्माण झाले आहेत का, असा प्रश्न उपस्थित केला जात होता. आमदार भास्कर जाधव यांनी स्पष्टीकरण दिले. त्यांनी सांगितले की राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दोन नेते येत असून इतर नेतेही लवकरच पोहोचतील. काही घरगुती कारणांमुळे आणि संपर्कातील त्रुटीमुळे उशीर झाला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आपण सर्वजण एकत्र आहोत आणि आघाडीत कोणताही तणाव नाही, असे ते म्हणाले. जयंत पाटील आणि सुप्रिया सुळे यांच्याशी संपर्क झाल्याचेही त्यांनी सांगितले.

चहापानाला जाणे म्हणजे सत्ताधाऱ्यांचा सन्मान करणे नसून तो सरकारी खर्चातून आयोजित कार्यक्रम असतो, असे त्यांनी नमूद केले. मात्र सध्याच्या परिस्थितीत विरोधकांचा सन्मान राखला जात नसल्याने बहिष्काराचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

## ज्येष्ठ नेते शरद पवार पुन्हा रुग्णालयात दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांची प्रकृती रविवारी काहीशी बिघडल्याने त्यांना पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे दाखल करण्यात आले आहे. शरीरातील पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे त्यांना अशक्तपणा आणि थकवा जाणवत असल्याची माहिती समोर आली आहे.

काही दिवसांपूर्वी श्वसनाचा त्रास झाल्याने त्यांना बारामतीवरून पुण्यात हलविण्यात आले होते. पाच दिवस उपचार घेतल्यानंतर १५ फेब्रुवारी रोजी त्यांना घरी सोडण्यात आले होते. मात्र, रविवारी पुन्हा प्रकृती अस्वस्थ वाटू लागल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुबी हॉलमध्ये उपचार करणारे डॉ. परवेझ ग्रँट यांनी सांगितले की, पवार यांना दोन दिवसांसाठी निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे. आवश्यक वैद्यकीय तपासण्या सुरू असून रक्तचाचणी आणि सिटीस्कॅन करण्यात आला आहे. प्राथमिक अहवाल सामान्य आल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले.

दरम्यान, रुग्णालय प्रशासनानेही पवार यांना कोणतीही गंभीर समस्या नसल्याचे स्पष्ट केले असून पुढील दोन दिवस त्यांच्यावर वैद्यकीय देखरेख ठेवली जाणार आहे.

### केंद्रीय नागरी विमान वाहतूकमंत्री मुरलीधर मोहोळ यांची माहिती

# विमान अपघाताचा प्राथमिक अहवाल २८ तारखेपर्यंत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांच्या मृत्यू झालेल्या विमान अपघाताचा प्राथमिक अहवाल २८ फेब्रुवारी रोजी किंवा त्यापूर्वी प्रसिद्ध केला जाईल, अशी माहिती केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी रविवारी दिली.

२८ जानेवारी रोजी बारामती विमानतळाजवळ त्यांचे लिअरजेट ४५ विमान कोसळले होते. या दुर्घटनेत पवार यांच्यासह अन्य चार जणांचा मृत्यू झाला होता.

येथील एका कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना मोहोळ म्हणाले, "घटनेच्या दिवसापासून ३० दिवसांच्या आत प्राथमिक अहवाल प्रसिद्ध केला जाईल. तो २८ फेब्रुवारी किंवा त्यापूर्वी सार्वजनिक होईल."

दरम्यान, रोहित पवार यांनी या अपघाताबाबत अनेक पत्रकार परिषद घेत विमानाच्या मालकीच्या कंपनीशी संबंधित अनियमितता आणि तांत्रिक त्रुटींचे मुद्दे उपस्थित केले आहेत. या प्रकरणात गैरप्रकार झाल्याची शंका त्यांनी व्यक्त केली आहे. शनिवारी कर्जत-जामखेडचे आमदार असलेल्या रोहित पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून अपघाताची चौकशी पूर्ण होईपर्यंत केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री के राम मोहन नायडू यांनी पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. या पत्राची प्रत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनाही पाठवण्यात आली आहे. पवार यांनी पत्रात संबंधित व्हीएसआर कंपनी आणि नायडू यांच्या पक्षाशी असलेल्या संबंधांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले असून स्वतंत्र आणि सक्षम प्राधिकरणाकडून, चौकशी करण्याची मागणी केली आहे.


मोहोळ यांनी स्पष्ट केले की नागरी विमान वाहतूक महासंचालनालय यांनी आधीच प्रेस निवेदन जारी करून सुरू असलेल्या चौकशीबाबत माहिती दिली आहे. "एजन्सीने स्पष्ट केले आहे की प्राथमिक अहवाल २८ फेब्रुवारीपूर्वी प्रसिद्ध केला जाईल. तपासाशी संबंधित सर्व माहिती सार्वजनिक केली जाईल. कोणाच्या टीकेवर मी भाष्य करू इच्छित नाही," असे ते म्हणाले.

१९ फेब्रुवारी रोजी नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने अपघातानंतर ३० दिवसांच्या आत प्राथमिक अहवाल जाहीर केला जाईल, असे स्पष्ट केले होते. २८ जानेवारीला सकाळी अजित पवार मुंबईवरून बारामतीच्या दिशेने जात होते. विमान बारामती विमानतळाजवळ पोहोचले होते. मात्र पहिल्या प्रयत्नात ते धावपट्टीवर उतरू शकले नाही. त्यामुळे पायलटने दुसरा प्रयत्न केला. मात्र हे विमान धावपट्टीपासून अवघ्या काही अंतरावर कोसळले. यात अजित पवार यांच्यासह एकूण ५ जणांचा मृत्यू झाला होता. या अपघाताचे कारण आता समोर येईल.

# उद्धव ठाकरे यांनी शरद पवारांना डावलले

### राज्यसभेसाठी काँग्रेस पक्षश्रेष्ठींबरोबर थेट चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** आगामी राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीमध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे. शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेस यांच्यात थेट चर्चा सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत असून या चर्चांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला बाजूला ठेवण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, उद्धव ठाकरे यांनी दिल्लीत काँग्रेस हायकमांडशी राज्यसभा निवडणुकीच्या संदर्भात चर्चा सुरू केली आहे. निवडणूक आयोगने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार महाराष्ट्रातील सात राज्यसभा जागांसाठी १६ मार्च २०२६ रोजी मतदान होणार आहे. विजयसाठी एका उमेदवाराला २७ मतांचा कोटा आवश्यक आहे. सध्याच्या आकडेवारीनुसार मविआकडे सुमारे ५० आमदारांचे बळ आहे. त्यामुळे सातपैकी किमान एक जागा आघाडीला मिळण्याची शक्यता मानली जात आहे. मात्र त्या जागेवर कोणत्या पक्षाचा उमेदवार असणार यावरून अंतर्गत चर्चांना सुरुवात झाली आहे.

काँग्रेस आणि ठाकरे गटामध्ये केवळ राज्यसभेच्या जागांवरच नव्हे तर विधान परिषदेच्या आगामी निवडणुकांवरही चर्चा सुरू आहे. मे महिन्यात विधान परिषदेच्या नऊ जागा रिक्त होणार असून त्यासाठीही निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत एका उमेदवाराला २९ मतांचा कोटा आवश्यक आहे. त्यामुळे या नऊपैकी किमान एक जागा मविआला मिळू शकते, अशी शक्यता व्यक्त होत आहे. मात्र या चर्चांबाबत अद्याप शरद पवार यांच्या गटाशी औपचारिक चर्चा झालेली नसल्याचे समजते. ज्या सात राज्यसभा जागांसाठी निवडणूक होत आहे त्यात शरद पवार यांची जागाही रिक्त होत आहे. ते पुन्हा राज्यसभेत जाणार की पक्ष नव्या चेहऱ्याला संधी देणार, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या हालचालींमुळे महाविकास आघाडीत अंतर्गत तणाव वाढण्याची शक्यता राजकीय वर्तुळात चर्चेत आहे. पुढील काही दिवसांत जागावाटप आणि उमेदवारांबाबत अंतिम निर्णय अपेक्षित आहे.

### त्या वाहनचालकांना ५.१६ कोटींचा रिफंड

**मुंबई :** मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील ३ फेब्रुवारीच्या गॅस टँकर अपघातानंतर सुमारे ३२ तास वाहतूक विस्कळीत झाली होती. या कालावधीत टोल आकारण्यात आलेल्या सुमारे १.२ लाख वाहनचालकांना आता मोठा दिलासा मिळणार असून त्यांना एकूण ५.१६ कोटी रुपयांचा परतावा देण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास निगमच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, एक्सप्रेसवेसह पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर आकारण्यात आलेल्या टोलचाही या परताव्यात समावेश आहे. अपघातानंतर टोल वसुली तात्पुरती थांबवण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र काही वाहनांच्या फास्टॅग खात्यातून स्वयंचलित प्रणालीमुळे टोल रक्कम वजा झाली होती.

# भारत-अमेरिका व्यापार कराराला तुर्तास ब्रेक!

### ट्रम्प यांच्या 'या` भूमिकेमुळे वाटाघाटींची बैठक लांबणीवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दिल्ली :** भारत आणि अमेरिका यांच्यात प्रस्तावित असलेल्या अंतरिम व्यापार कराराच्या वाटाघाटींना तुर्तास ब्रेक लागला आहे. वॉशिंग्टन येथे सोमवारपासून (23 फेब्रुवारी) सुरू होणारी दोन्ही देशांच्या वाटाघाटी समितीची तीन दिवसीय बैठक अनपेक्षितपणे लांबणीवर टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयात शुल्काबाबत घेतलेले नवे निर्णय आणि अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल, या पाऱ्श्वभूमीवर दोन्ही देशांनी हा सावध पवित्रा घेतला आहे. या बैठकीसाठी वाणिज्य मंत्रालयातील सहसचिव दर्पण जैन यांच्या नेतृत्वाखालील पथक अमेरिकेला रवाना होणार होते. मात्र, सध्याच्या बदलत्या घडामोडींचा आणि त्यांच्या परिणामांचा सखोल अभ्यास करण्यासाठी अधिक वेळ आवश्यक आहे. त्यामुळे परस्पर संमतीने ही बैठक काही काळासाठी पुढे ढकलण्यात आली आहे, असे वाणिज्य मंत्रालयातील सूत्रांनी स्पष्ट केले आहे. यापूर्वीच भारत आणि अमेरिका यांच्यात एका फ्रेमवर्कवर सहमती झाली होती, ज्यानुसार अमेरिका भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क 18 टक्क्यांपर्यंत खाली आणणार आहे. सध्या भारताला काही वस्तूंवर 25 टक्क्यांपासून ते 50 टक्क्यांपर्यंत दंडात्मक शुल्क सोसावे लागत आहे. 2024-25 या वर्षात दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार 186 अब्ज डॉलर्सवर पोहोचला असून, अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे.

केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी हा करार मार्चमध्ये पूर्ण होऊन एप्रिलपासून लागू होईल, असे संकेत दिले होते. या घडामोडींमागे अमेरिकेतील अंतर्गत कायदेशीर आणि आर्थिक पेच कारणीभूत असल्याचे मानले जाते. ट्रम्प प्रशासनाने विविध देशांवर लादलेले जागतिक आयात शुल्क अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने बेकायदा ठरवले होते. या निकालानंतर संतापलेल्या ट्रम्प यांनी शुक्रवारी सर्व देशांवर 10 टक्के नवीन शुल्क लागू केले आणि शनिवारी त्यात वाढ करून ते 15 टक्के केले.

### देशभर किसान संमेलनांची घोषणा; खर्गे–राहुल गांधींची केंद्र सरकारवर टीका

# भारत-अमेरिका व्यापार कराराविरोधात काँग्रेसचा एल्गार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** भारत आणि अमेरिका यांच्यातील प्रस्तावित व्यापार कराराविरोधात Indian National Congressने आक्रमक भूमिका घेत देशभर किसान संमेलनांची घोषणा केली आहे. महाराष्ट्रातील यवतमाळ, मध्य प्रदेशातील भोपाळ आणि राजस्थानमधील श्री गंगानगर येथे पहिल्या टप्प्यात ही संमेलने आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती पक्षाने दिली.

ही रणनीती Mallikarjun Kharge यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत ठरवण्यात आली. बैठकीला लोकसभेतील विरोधी पक्षनेते Rahul Gandhi, संघटन सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, राज्यसभा खासदार रजनी पाटील तसेच विविध राज्यांचे प्रदेशाध्यक्ष उपस्थित होते. बैठकीत व्यापार कराराचे संभाव्य परिणाम आणि पुढील आंदोलनाची दिशा यावर सविस्तर चर्चा झाली.

बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना पक्षाचे माध्यम सरचिटणीस Jairam Ramesh यांनी सांगितले की, या कराराचा कापूस, सोयाबीन, मका उत्पादक शेतकरी तसेच फळे व काजू उत्पादकांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. आयातीवरील सवलतींमुळे देशांतर्गत बाजारपेठेवर दबाव वाढून शेतमालाच्या दरात घसरण होण्याची भीती आहे. त्यामुळे शेतकरी संघटनांना सोबत घेऊन व्यापक जनजागरण मोहीम राबवली जाणार आहे.

किसान संमेलनांत पक्षाध्यक्ष खर्गे आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी प्रत्यक्ष सहभागी होणार असून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधणार आहेत. केंद्र सरकारने या कराराबाबत संसद व देशवासीयांना सविस्तर माहिती द्यावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे.

खर्गे आणि राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करत, "देशाच्या शेतकऱ्यांच्या हितापेक्षा परदेशी दबावाला प्राधान्य दिले जात आहे," असा आरोप केला. शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम करणारे कोणतेही निर्णय घेताना व्यापक चर्चा आणि सल्लामसलत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पहिल्या टप्प्यात सहा राज्यांमध्ये किसान संमेलनांच्या माध्यमातून कराराविरोधात आवाज उठवण्यात येणार असून, त्यानंतर आंदोलनाची व्याप्ती वाढवण्याचा इशारा काँग्रेसने दिला आहे. आगामी काळात हा मुद्दा राष्ट्रीय पातळीवर गाजण्याची चिन्हे आहेत.

## राज्यात आरटीई प्रवेशाच्या जागांमध्ये मोठी घट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यांतर्गत दिल्या जाणाऱ्या 25 टक्के राखीव प्रवेश जागांमध्ये गेल्या नऊ वर्षांत लक्षणीय घट झाली आहे. राज्यात 2018-19 ते 2026-27 या कालावधीत 325 शाळा आणि 13 हजार 255 जागा आरटीई प्रवेश प्रक्रियेबाहेर गेल्याने सामाजिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांतील विद्यार्थ्यांच्या संधी कमी झाल्या आहेत. 2018-19 मध्ये 8,980 शाळांमधून 1 लाख 26 हजार 140 जागा उपलब्ध होत्या. 2026-27 साठी ही संख्या 8,655 शाळा आणि 1 लाख 12 हजार 885 जागांपर्यंत घसरली आहे. विनाअनुदानित खासगी शाळांचा आरटीई प्रक्रियेतील सहभाग कमी होत असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभेचे कार्याध्यक्ष डॉ. शरद जावडेकर आणि 25 टक्के आरक्षण पालक सभेच्या अध्यक्षा सुरेखा खरे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती मांडली. तसेच, भाषिक अल्पसंख्याक शाळांमध्ये किमान 51 टक्के विद्यार्थी संबंधित भाषिक गटातील आहेत का, याची पडताळणी करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. आरटीई प्रवेश प्रक्रिया लवकर सुरू करावी आणि प्रक्रियेबाबत दरवर्षी निर्माण होणारी अनिश्चितता दूर करण्यासाठी शासनाने कायमस्वरूपी धोरण जाहीर करावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

**नामांकित शाळा 'आरटीई'बाहेर?**

शासनाकडून शुल्क प्रतिपूर्ती वेळेत होत नसल्यामुळे अनेक शाळा आरटीईपासून दूर जात आहेत. काही शाळांनी अल्पसंख्याक दर्जा घेतल्याने त्या आरटीईच्या कक्षेबाहेर गेल्या आहेत. पुण्यातील काही नामांकित शाळांची नावे 2026-27 च्या यादीत नसल्याने पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे, असा मुद्दाही मांडण्यात आला.

## संपादकीय

# होर्मुझचे सावट आणि जागतिक अस्थिरता

**जिनेव्हा येथे चर्चा, आखातात युद्धनौका, अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव पुन्हा टोकावर. अणुकार्यक्रमाच्या प्रश्नावरून सुरू असलेली रस्सीखेच आता होर्मुझ सामुद्रधुनीवर येऊन ठेपली आहे. जागतिक ऊर्जा सुरक्षेची धमनी असलेला हा जलमार्ग बंद करण्याची धमकी म्हणजे अर्थकारणालाच दिलेले आव्हान.**

आखातातील वारे पुन्हा एकदा धोक्याची चाहूल देत आहेत. जिनेव्हा येथे अमेरिका आणि इराण यांच्यात अणुकार्यक्रमावर चर्चा सुरू असतानाच समुद्रात युद्धनौकांची रांग लागते, तेव्हा राजनैतिक भाष्य आणि लष्करी हालचाली यांतील दरी उघड दिसते. एका हातात कराराचा मसुदा आणि दुसऱ्या हातात तोफांची नळी हीच सध्याची विसंगती. अमेरिकेचा आग्रह स्पष्ट आहे: इराणचा अणुकार्यक्रम पूर्णतः निकामी करणे. इराणची भूमिकाही तितकीच ठाम: अणुऊर्जा हा सार्वभौम हक्क; अणुशस्त्रे हा उद्देश नाही. या दोन विधानांतील शब्दफेऱ्यांपेक्षा त्यामागील अविश्वास अधिक बोलका आहे. म्हणूनच चर्चेचे फेरे चालू असतानाच अमेरिकेने आखातात लष्करी उपस्थिती वाढवली आहे. अमेरिकी विमानवाहू जहाज त्या दिशेने सरकते आहे, तर एक आधीच तैनात आहे. लढाऊ विमाने, इंधनपुरवठा टँकर्स आणि गुप्तचर हालचाली हे सर्व चर्चा सुरू आहे, हे वाक्य किती बेगडी आहे, हे दर्शवणारे. या साऱ्या घडामोडींत जगाचे लक्ष आपोआप वळते ते होर्मुझकडे. हा फक्त जलमार्ग नाही; तर तो जागतिक अर्थकारणाची नाडी आहे. पर्शियन आखात आणि अरबी समुद्र यांना जोडणारा हा अरुंद दरम्यानचा मार्ग जगातील सागरी तेलवाहतुकीपैकी सुमारे पाचवा हिस्सा ज्यातून जातो तोच आज पुन्हा चर्चेत. इराणने अनेकदा या सामुद्रधुनीला 'कार्ड' म्हणून वापरले आहे. निर्बंध वाढले की 'सामुद्रधुनी बंद' ही धमकी समोर येते. इतिहास साक्ष देतो की धमक्या दिल्या गेल्या; पण प्रत्यक्ष बंदी घालण्याचा निर्णय इराणने टाळला. १९८० च्या दशकातील 'टँकर युद्धे' असोत किंवा निर्बंधांच्या लाटा इराणने मर्यादा ओलांडली नाही. कारण सामुद्रधुनी बंद करणे म्हणजे स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारणे. इराणचे तेलही त्याच मार्गाने बाहेर पडते. जागतिक बाजारपेठेत त्याचे मोजके मित्र विशेषतः आशियातील मोठे ग्राहक यांनाही तो दुरावेल. या जलमार्गाचे महत्त्व आकड्यांत मांडले तर चित्र अधिक ठळक होते. दररोज सुमारे २० दशलक्ष बॅरल कच्चे तेल, कंडेन्सेट आणि पेट्रोलियम उत्पादने या मार्गे जातात. द्रवीभूत नैसर्गिक वायूची वाहतूकही प्रचंड. ओपेक मधील प्रमुख उत्पादक सौदी अरेबिया, यूएई, कुवेत, इराक यांच्या निर्यातीचा मोठा भाग इथूनच जगभरात जातो. जगातील आघाडीचा एलएनजी निर्यातदार कतार याचे उत्पादनही याच मार्गाने पुढे जाते. हा पुरवठा विस्कळीत होणे म्हणजेच, तेलदरांचा भडका, चलनफुगवटा आणि जागतिक मंदीची नवी अनिश्चितता. विशेष म्हणजे या प्रवाहातील बहुतांश माल आशियाकडे वळतो. चीन, भारत, जपान आणि दक्षिण कोरिया हे प्रमुख ग्राहक. ऊर्जा सुरक्षेच्या समीकरणात या देशांचे स्थान निर्णायक. चीन हा इराणचा मोजका आर्थिक आधार. भारताने आयातीचे स्रोत काही प्रमाणात विविध केले असले तरी पूर्ण सुरक्षितता नाही. त्यामुळे इराणला जर जगाला धडा शिकवायचा असेल, तरी तो आपल्या मित्रांना दुखावून का देईल? तरीही प्रश्न उरतो: यावेळी वेगळे काय? इराणची अंतर्गत स्थिती डळमळीत. आर्थिक निर्बंध, महागाई, सामाजिक असंतोष आणि सत्तेवरील दबाव. इस्रायलशी तणाव, अमेरिकेची आक्रमक भूमिका आणि प्रादेशिक राजकारणातील बदलते समीकरण. या सर्वांचा एकत्र परिणाम म्हणजे अस्थिर मनःस्थिती. सत्ताधारी धर्मशाहीला जर अस्तित्वाचा प्रश्न भेडसावला, तर तिने टोकाचा मार्ग अवलंबू नये याची खात्री देता येत नाही. परंतु सामुद्रधुनी बंद करणे हा केवळ लष्करी नव्हे तर कायदेशीर आणि राजनैतिक प्रश्नही आहे. समुद्राच्या कायद्यांनुसार आंतरराष्ट्रीय नौवहनास 'ट्रान्झिट पासेज'चा अधिकार आहे. अशा वेळी इराणने एकतर्फी अडथळा आणला तर तो केवळ अमेरिकेलाच नव्हे तर व्यापक आंतरराष्ट्रीय समुदायालाच आव्हान ठरेल. परिणामी व्यापक लष्करी प्रतिसादाची शक्यता वाढेल. इराणला अपेक्षित असलेला दबाव कमी न होता उलट तीव्र होईल. म्हणूनच इराणचे 'होर्मुझ कार्ड' हे प्रत्यक्ष खेळण्यापेक्षा दाखवण्याचे अधिक. शक्तिप्रदर्शन, कवायती, काही तासांची अंशतः अडवणूक या मर्यादित हालचालींनी संदेश दिला जातो; पण अंतिम पाऊल उचलले जात नाही. कारण जागतिक अर्थव्यवस्था आधीच अस्थिरतेच्या टोकावर उभी आहे. तेलदर वाढले की सर्वच देशांना फटका बसतो. ऊर्जा बाजारातील धक्के हे राजकीय भूकंप घडवू शकतात. अमेरिकेसाठीही समीकरण सोपे नाही. अणुकार्यक्रम पूर्णपणे नष्ट करणे हा राजकीय नारा असू शकतो; पण त्याची अंमलबजावणी म्हणजे दीर्घकालीन संघर्ष. 'राजवट बदल' ही कल्पना आकर्षक वाटली तरी त्याचे दुष्परिणाम इराक आणि अफगाणिस्तानच्या अनुभवांनी स्पष्ट केले आहेत. आखातात नव्या युद्धाची ठिणगी पडली, तर त्याचा धूर संपूर्ण जगाला वेढेल. आजची परिस्थिती म्हणूनच विसंगत आणि धोकादायक. चर्चा आणि धमक्या, करार आणि कवायती, आश्वासने आणि आरोप या सर्वांमध्ये खरी गरज आहे ती संयमाची. होर्मुझ ही धमनी जर थांबली, तर जागतिक अर्थव्यवस्थेचे हृदयच अडखळेल. इराणला हे ठाऊक आहे; अमेरिकेलाही. प्रश्न इतकाच की राजकीय अहंकार आणि अंतर्गत दबाव यांच्या दरम्यान विवेकाचा आवाज किती ऐकू येतो. सामुद्रधुनी बंद करणे म्हणजे जगाला शिक्षा देणे नव्हे; तर स्वतःलाही त्यात ओढून घेणे. आणि आखातातील या अस्थिर वाऱ्यांना जर युद्धाचे वादळ व्हायचे असेल, तर त्याची झळ सर्वांनाच बसणार आहे. संयम हा पर्याय नसून आवश्यकता आहे, हे दोन्ही बाजूंनी जितक्या लवकर मान्य केले, तितके जगासाठी हिताचे.

# आर्थिक अस्त्रांचे राजकारण आणि त्याच्या मर्यादा!

**» जागतिक व्यापाराच्या पटावर अमेरिका आपली आर्थिक अस्त्रे अधिक धारदार करत आहे. त्या अस्त्रांची राजकीय उपयुक्तता आणि कायदेशीर मर्यादा समजून घेतल्याशिवाय भारतासारख्या देशांनी आपली भूमिका ठरवणे धोक्याचे ठरू शकते.**




अमेरिकेच्या आर्थिक धोरणाकडे पाहताना एक गोष्ट लक्षात घ्यावी लागते. तेथे व्यापार हा केवळ अर्थकारणाचा विषय नसून राष्ट्रीय सुरक्षेचा विस्तार मानला जातो. त्यामुळे शुल्कवाढ, आयातबंदी, तंत्रज्ञान निर्यात नियंत्रण, परकीय गुंतवणुकीवरील देखरेख, आर्थिक निर्बंध अशा विविध साधनांचा वापर परिस्थितीनुसार केला जातो. एका कायद्यावर अवलंबून राहणे ही अमेरिकन पद्धत नाही; तर उपलब्ध कायदेशीर चौकटींचा संच परिस्थितीनुरूप वापरणे ही त्यांची कार्यपद्धती आहे. आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक अधिकार कायदा असो वा व्यापार विस्ताराशी संबंधित तरतुदी, अमेरिकेच्या अध्यक्षांकडे व्यापक अधिकार असतात. मात्र हे अधिकार अमर्याद नसतात. न्यायालयीन पुनरावलोकन, संसदीय देखरेख आणि उद्योगक्षेत्राचा दबाव या सर्व घटकांमुळे या उपाययोजनांना मर्यादा येतात. म्हणूनच एखादा निर्बंध जाहीर झाला म्हणजे तो कायमस्वरूपी वास्तव ठरतो, असे नाही. तो राजकीय संदेश देणारा आणि चर्चेतील बाजी मजबूत करणारा उपाय असतो. अलीकडच्या काळात चीनविरुद्धच्या शुल्कवाढीपासून ते तंत्रज्ञान निर्यातीवरील निर्बंधांपर्यंत अनेक उदाहरणे पाहायला मिळाली. राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली आर्थिक उपाययोजना राबवण्याची पद्धत आता अधिक रूढ झाली आहे. परंतु यामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होते, किंमती वाढतात आणि मित्रदेशांनाही फटका बसतो. म्हणूनच ही अस्त्रे वापरताना अमेरिका स्वतःही सावध पावले टाकते. भारतासाठी या घडामोडींचा अर्थ स्पष्ट आहे. अमेरिका-भारत संबंध सामरिकदृष्ट्या दृढ होत असले, तरी व्यापार आणि तंत्रज्ञानाच्या बाबतीत अनिश्चिततेची छाया कायम आहे. एखाद्या धोरणात्मक मतभेदाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक साधने वापरली जाऊ शकतात, ही जाणीव दुर्लक्षित करता येत नाही. त्यामुळे केवळ राजनैतिक मैत्री पुरेशी ठरत नाही; परस्पर हितसंबंधांचे जाळे अधिक खोल असणे आवश्यक असते. याच ठिकाणी परस्पर गुंतवणुकीचा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. जेथे दोन्ही देशांचे उद्योग, रोजगार आणि तंत्रज्ञान एकमेकांत गुंतलेले असतात, तेथे निर्बंध लादण्याची किंमतही दोघांनाही चुकवावी लागते. परंतु संबंध एकतर्फी असतील, तर आर्थिक दबावाचे राजकारण सोपे होते. म्हणूनच भारताने अमेरिकेकडे केवळ बाजारपेठ म्हणून पाहू नये; तर दीर्घकालीन गुंतवणूक आणि संशोधन भागीदारीचे क्षेत्र म्हणून पाहिले पाहिजे. अर्थकारणात अनिश्चितता हीच एकमेव निश्चितता असते. अमेरिकेतील अंतर्गत राजकारण, निवडणुकीचे गणित आणि उद्योगसमूहांचा प्रभाव या सर्वांचा परिणाम बाह्य धोरणांवर होतो. त्यामुळे एखादा कायदा किंवा आदेश हा अंतिम शब्द नसतो; तो व्यापक राजकीय समीकरणाचा भाग असतो. भारतानेही आपल्या धोरणात हीच लवचिकता ठेवली पाहिजे. याचा अर्थ असा नाही की भारताने प्रतिक्रियात्मक भूमिका घ्यावी. उलट, बहुपक्षीय व्यासपीठांवर सक्रिय सहभाग, पर्यायी पुरवठा साखळ्यांची उभारणी, स्वदेशी उत्पादनक्षमता वाढवणे आणि तंत्रज्ञान संशोधनात गुंतवणूक या मार्गांनी दीर्घकालीन स्वायत्तता साधता येऊ शकते. स्वावलंबनाचा घोष पुरेसा नाही; त्यामागे संरचनात्मक बदलांची पायाभरणी आवश्यक असते. अमेरिकेच्या आर्थिक अस्त्रांची धार नाकारता येत नाही. पण ती सर्वशक्तिमानही नाही. जागतिक अर्थव्यवस्था इतकी परस्परावलंबी झाली आहे की कोणत्याही मोठ्या निर्णयाचे परिणाम सीमारेषांपलीकडे पसरतात. म्हणूनच अमेरिकेलाही मित्रदेशांच्या हिताचा विचार करावा लागतो. हेच भारतासाठी संधीचे दार उघडते. आर्थिक अस्त्रे ही अंतिम ध्येय नसतात; ती राजकीय हेतू साध्य करण्याची साधने असतात. भारताने या वास्तवाचा स्वीकार करून आपली रणनीती आखली, तर अनिश्चिततेतून संधी शोधता येईल. अन्यथा प्रत्येक नव्या निर्बंधाकडे संकट म्हणून पाहण्याची सवयच अंगवळणी पडेल. जागतिक व्यापाराचा पट बदलतो आहे. त्या पटावर कोणाकडे किती बाण आहेत, यापेक्षा कोण कधी आणि कसा वापरतो, हे अधिक महत्त्वाचे ठरते. भारताने या खेळातील नियम समजून घेतले, तर त्याची भूमिका केवळ प्रतिसाद देणारी नव्हे, तर दिशादर्शक ठरू शकेल.

## पिंपरी-चिंचवडमध्ये 'अजितसृष्टी' उभारण्यास मंजुरी

### नव्या प्रशासकीय इमारतीच्या आवारात भव्य स्मारक; सर्वपक्षीय एकमताने निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी-चिंचवड :** शहराच्या राजकीय आणि विकासाच्या इतिहासात महत्त्वपूर्ण ठरणारा निर्णय महापालिका सर्वसाधारण सभेत एकमताने घेण्यात आला. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी नव्या प्रशासकीय इमारतीच्या आवारात "अजितसृष्टी" उभारण्याच्या प्रस्तावाला सर्वपक्षीय नगरसेवकांनी मंजुरी दिली. याबाबत महापौर रवि लांडगे यांनी अधिकृत घोषणा केली.

भाजप नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी अजित पवार यांच्या स्मरणार्थ भव्य स्मारक उभारण्याची सूचना सभागृहात मांडली होती. त्यास सर्वपक्षीय पाठिंबा मिळाल्याने प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. याबद्दल आमदार लांडगे यांनी महापौर व नगरसेवकांचे आभार मानले.

चिंचवड येथील डी-मार्टसमोरील सुमारे ३३.८६ एकर जागेत महापालिकेची नवीन प्रशासकीय इमारत उभारली जात आहे. त्यापैकी ८.६५ एकर जागेवर मुख्य इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असून भविष्यात संपूर्ण प्रशासकीय कामकाज याच भव्य इमारतीतून चालणार आहे. याच परिसरात "अजितसृष्टी" साकारली जाणार आहे.

या स्मारकात शहराच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या विकासाचा प्रवास, औद्योगिक प्रगती, नागरी सुविधा विस्तार आणि भविष्यातील विकास आराखड्याची 'फ्युचर प्रिंट' मांडली जाणार आहे. तसेच अजित पवार यांचा ब्राँझमधील पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येईल. जुन्या प्रशासकीय भवनातील सभागृहात त्यांचे तैलचित्र बसविण्याचा तसेच नव्या इमारतीतील प्रमुख सभागृहाला त्यांचे नाव देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. हापौर रवि लांडगे यांनी प्रशासनाला संयुक्त पाहणी करण्याचे आणि "अजितसृष्टी" उभारणीची प्रशासकीय प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले. "लोकनेते अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी दिलेले योगदान बहुमूल्य आहे. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी 'अजितसृष्टी' उभारण्याचा निर्णय शहराच्या विकासदृष्टीला बळ देणारा ठरेल," असे आमदार महेश लांडगे यांनी म्हटले आहे.

## हडपसरकरांना दिलासा; वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उड्डाणपुलात बदलाचा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** वाढत्या वाहतूक कोंडीमुळे त्रस्त पुणेकरांसाठी महत्त्वाची बातमी आहे. अलीकडील TomTom ट्रॅफिक इंडेक्स अहवालात जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरांमध्ये पुण्याचा पाचवा क्रमांक लागल्यानंतर प्रशासनाने महत्त्वाच्या प्रकल्पांना गती देण्याचा निर्णय घेतला आहे.

पुणे रिंग रोड प्रकल्पाच्या पूर्व भागाचे काम २०२८ पर्यंत, तर पश्चिम भाग २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पूर्व भागातील १२ पैकी ९ पॅकेजेसवर प्रत्यक्ष काम सुरू असून उर्वरित पॅकेजेस लवकरच मंजुरीच्या प्रक्रियेतून पूर्ण होतील.

हडपसर ते यवत दरम्यान उन्नत मार्ग उभारण्यात येणार असून या मार्गावर भविष्यात मेट्रो सेवा सुरू करण्याचेही नियोजन आहे. हा प्रकल्प महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन (महामेट्रो) मार्फत राबवला जाणार आहे.

दरम्यान, गाडीतळ आणि नोबेल हॉस्पिटल परिसरातील विद्यमान उड्डाणपुलांमध्ये बदल किंवा पुनर्बांधणी करण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे. या सर्व उपाययोजनांमुळे भविष्यात हडपसरसह पुण्यातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## उन्हाळा सुरू होण्याआधीच वीज बिलांचा 'शॉक'; पुणेकर हैराण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शहरातील वीज ग्राहकांना गेल्या काही दिवसांपासून अवास्तव बिलांचे संदेश येत असल्याने संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. उन्हाळा अद्याप पूर्णपणे सुरू झालेला नसताना आणि एसी-पंख्यांचा वापर वाढलेला नसतानाही युनिटमध्ये मोठी वाढ दाखवून दुप्पट रक्कम आकारली जात असल्याची तक्रार ग्राहकांकडून होत आहे.

दर महिन्याला ठरावीक वीज वापर असलेल्या मध्यमवर्गीय कुटुंबांना अचानक वाढीव बिलांचे मेसेज आल्याने धक्का बसला आहे. अनेक जण २० तारखेच्या सुमारास येणारे बिल थेट ऑनलाइन भरतात; मात्र या महिन्यात अपेक्षेपेक्षा जास्त रक्कम दिसत असल्याने शंका व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे महावितरण कडून येणाऱ्या या बिलांमध्ये सौरऊर्जा वापरणाऱ्या ग्राहकांचाही समावेश आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना अंतर्गत सोलार पॅनेल बसवलेल्या काही ग्राहकांनाही वाढीव युनिट दाखवले गेल्याची तक्रार आहे.

चुकीचे मीटर रीडिंग, अंदाजे बिलिंग किंवा तांत्रिक बिघाड यापैकी नेमके कारण काय, याबाबत अधिकृत स्पष्टीकरण मिळालेले नाही. ग्राहकांनी बिलातील युनिट तपासून मागील तीन महिन्यांशी तुलना करावी व शंका असल्यास तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## हॉर्नच्या जाबावरून ज्येष्ठाला बेदम मारहाण

### बुलेट चालक व साथीदारांचा स्वारगेटमध्ये हल्ला; क्रिकेट बॅटने मारहाण, पोलिसांत गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे : शहरात बुलेटच्या सायलेन्सरमधून येणारा कर्णकर्कश आवाज आणि मोठे हॉर्न यामुळे नागरिक त्रस्त असताना, अशाच प्रकाराबाबत जाब विचारल्याने एका ज्येष्ठ नागरिकाला मारहाण झाल्याची संतापजनक घटना स्वारगेट परिसरातील महर्षीनगर येथे घडली. केवळ हॉर्न का वाजवता, अशी विचारणा केल्यामुळे बुलेट चालक आणि त्याच्या साथीदारांनी क्रिकेट बॅट व लाथाबुक्क्यांनी हल्ला केल्याचे समोर आले आहे.


तक्रारदार ज्येष्ठ नागरिक महर्षीनगरमधील एका सोसायटीत राहतात. १७ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास एक युवक बुलेटवरून सोसायटीच्या आवारात आला. त्याने मित्राला बोलावण्यासाठी सलग आणि कानठळ्या बसवणारा हॉर्न वाजवण्यास सुरुवात केली. दुपारची वेळ असल्याने आणि आवाजामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाल्याने संबंधित ज्येष्ठाने त्याला हॉर्न बंद करण्याची विनंती केली.

याचा राग आल्याने आरोपीने सुरुवातीला शिवीगाळ केली. त्यानंतर काही वेळातच त्याने आपल्या साथीदारांना घटनास्थळी बोलावले. आठ-दहा जणांच्या या टोळक्याने ज्येष्ठ नागरिकाला घेरून क्रिकेटच्या बॅटने मारहाण केली तसेच लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करून गंभीर दुखापत केली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी स्वारगेट पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक शिरसाठ पुढील तपास करत आहेत. आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी हालचाली सुरू केल्या आहेत. दरम्यान, शहरात सायलेन्सरमध्ये फेरफार करून मोठा आवाज करणाऱ्या बुलेट चालकांविरुद्ध पुणे पोलिसांनी अलीकडेच विशेष मोहीम राबवून १५० हून अधिक वाहनांवर कारवाई केली आहे. विरुद्ध दिशेने वाहन चालवणे, कर्णकर्कश हॉर्न वाजवणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुचाकीस्वारांविरोधात कठोर पावले उचलली जात असतानाच ही घटना घडल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

### ३४८ मॉडिफाइड साइलेंसर जप्त; बुलेटस्वारांना दंड, १४८ वाहने ताब्यात;

## पुणे शहर वाहतूक पोलीस यांची मोठी कारवाई; ध्वनिप्रदूषणावर मोठा आघात

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** शहरात वाढत्या ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्यासाठी पुणे शहर वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम राबवत अवैध मॉडिफाइड साइलेंसरविरोधात मोठी कारवाई केली आहे. शहरातील विविध भागांत घेतलेल्या या विशेष ड्राईव्हमध्ये तब्बल ३४८ मॉडिफाइड साइलेंसर जप्त करण्यात आले, तर १४८ वाहने ताब्यात घेण्यात आली.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, बुलेटसह काही दुचाकींवर कर्णकर्कश आवाज निर्माण करणारे अवैध साइलेंसर बसवले जात होते. या साइलेंसरमुळे आवाजाची पातळी कायदेशीर मर्यादेपेक्षा जास्त वाढत होती. निवासी परिसर, शाळा, रुग्णालये आणि वर्दळीच्या भागांत यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. तक्रारींची संख्या वाढल्यानंतर वाहतूक विभागाने ठोस पाऊल उचलत ही मोहीम सुरू केली.

या कारवाईदरम्यान संबंधित वाहनचालकांकडून ३,३४,००० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच, फक्त साइलेंसर कारवाईपुरतेच मर्यादित न राहता इतर वाहतूक नियमभंगांवरही कठोर कारवाई करण्यात आली. हेल्मेट न घालणे, सिग्नल तोडणे, कागदपत्रांचा अभाव, तसेच नशेत वाहन चालवणे अशा विविध उल्लंघनांवर एकूण १५,७३,८०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

ड्रंक अँड ड्राईव्हविरोधातही विशेष मोहीम राबवून दोषींवर न्यायालयीन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. वाहतूक पोलिसांनी स्पष्ट केले की,

**पुणे शहर वाहतूक पोलीस यांचा धडक ॲक्शन प्लॅन**

- ३४८ मॉडिफाइड साइलेंसर जप्त
- १४८ वाहने ताब्यात
- ₹३,३४,००० दंड (साइलेंसर कारवाई)
- ₹१५,७३,८०० एकूण दंड वसुली

**कारवाई का?**

- शहरात वाढत्या कर्णकर्कश आवाजामुळे नागरिक त्रस्त.
- निवासी भाग, शाळा, रुग्णालये परिसरात तक्रारींमध्ये वाढ.

ध्वनिप्रदूषण हा केवळ त्रासाचा विषय नसून सार्वजनिक आरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्न आहे. त्यामुळे नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध पुढेही अशीच कठोर कारवाई सुरू राहणार आहे.

नागरिकांनी शांतता राखण्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, वाहनांमध्ये अवैध बदल टाळावेत आणि अधिकृत साइलेंसरच वापरावेत, असे आवाहन वाहतूक विभागाने केले आहे. या विशेष मोहिमेमुळे शहरातील आवाजाची पातळी कमी होण्यास आणि सार्वजनिक सुरक्षितता वाढविण्यास निश्चितच मदत होईल.

## पुण्यात गुन्हे शाखेची धडक कारवाई; रस्ता पेठ-लष्कर भागातील २ आरोपी अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** रस्ता पेठ आणि लष्कर परिसरात ३०,००० रुपयांची रोकड लुटून पसार झालेल्या दोन चोरट्यांना पुणे गुन्हे शाखा पोलिसांनी सापळा रचून अटक केली आहे. या प्रकरणातील तपासात आरोपींचे इतर गुन्हेही उघड झाले असून, घटनास्थळी मिळालेल्या माहितीनुसार दोघांनी फक्त रस्ता पेठेतच नव्हे तर लष्कर भागातही लुटीचे प्रयत्न केले होते.

आरोपी म्हणून अस्लम इस्माइल शेख उर्फ बिल्ला (वय २२) आणि रेहान जमील शेख उर्फ रिहान (वय १९) या दोघांची खुनाखुनी नोंद असून ते हडपसरमधील ससाणेनगर, म्हाडा वसाहत क्षेत्रात राहतात असे समजते. आठवडाभरापूर्वी रास्ता पेठेतील शांताई हॉटेल चौकात त्यांनी एका व्यक्तीला अडवून त्याच्याकडील ३०,००० रुपयांची रोकड लुटल्याची घटना घडली होती, ज्याचा तपास समर्थ पोलीस ठाण्यात नोंद झाला होता.

गुन्हे शाखेच्या युनिट १ च्या तपासात पोलिसांना पोलीस कर्मचारी हेमंत पेरणे आणि निलेश साबळे यांकडून मिळालेल्या माहितीनुसार सापळा रचण्यात आला, ज्यातून दोघांना ताब्यात घेतले गेले. चौकशीत आरोपी शेख यांनी रस्ता पेठेतच नव्हे तर लष्कर भागातही सरबतवाला चौकाजवळ दोन लोकांची लूट करण्याचा प्रयत्न केल्याची कबुली दिली. त्यांच्या विरुद्ध विविध पोलीस ठाण्यात एकूण २१ गुन्हे आधींच दाखल आहेत. या कारवाईत गुन्हे शाखेने नियमित तपास व तांत्रिक माहितीचा यथायोग्य वापर करत गुन्ह्यांचा शोध लावला असून, आरोपींच्या गुन्हेगार नेटवर्कचा पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणात आणखी आरोपी किंवा इतर गुन्हे उघड होण्याची शक्यता लक्षात घेता पुढील तपास अधिक खोलवर चालू आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### गारपीटीने कळंबच्या द्राक्षबागांचे कंबरडे मोडले

**मंचर :** कळंब येथे एप्रिल-मेतील गारपीट व अवकाळी पावसामुळे ८०-९० टक्के द्राक्षबागांचे नुकसान झाले. सुमारे २००-२५० एकर क्षेत्र बाधित झाले असून यंदा उत्पादन अत्यल्प आहे. एकरी सात-आठ लाखांचे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले. घाऊक बाजारात १४० ते २०० रुपये किलो दर मिळत असला, तरी उत्पादन घटल्याने त्याचा फायदा मर्यादित ठरत आहे.

### मोफत आरोग्य तपासणी शिबिरास भरघोस प्रतिसाद

**पुणे :** रुद्रांग वाद्यपथक ट्रस्ट व अखिल बाजीराव रोड रामनवमी उत्सव समिती ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने बाजीराव रोड येथे आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरास सुमारे ११०० ते १२०० नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिरात रक्तदाब, साखर, रक्तगट, कोलेस्टेरॉल, दंत तपासणी, मोतीबिंदू, मॅमोग्राफी तसेच मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

### दौंड पोलिसांची कारवाई; ८०५ लिटर गावठी दारू जप्त

**दौंड :** दौंड पोलीस ठाणे हद्दीत नगरमोरी येथे नाकाबंदीत ८०५ लिटर गावठी हातभट्टी दारू वाहतूक करणारा टेम्पो जप्त करण्यात आला. १,००,६२५ रुपयांची दारू व २.५० लाखांचा टेम्पो असा एकूण ३.५० लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला. टेम्पोमधील २३ कॅन तपासात सापडले. लोणी काळभोर येथील चालक यलगुंड दोडमणी याच्यावर गुन्हा दाखल आहे.

## अंत्यविधीसाठी मोबाईल टॉर्चचा आधार; विजेअभावी ग्रामस्थांची कुचंबणा

# तक्रारवाडी स्मशानभूमी अंधारात!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भिगवण :** "मृत्यूनंतर सन्मानजनक अंतिम निरोप मिळावा" हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत मानवी हक्क मानला जातो. मात्र तक्रारवाडी येथील स्मशानभूमी आजही अंधारात असल्याने अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नातेवाईकांची मोठी गैरसोय होत आहे. कायमस्वरूपी वीजपुरवठ्याची कोणतीही व्यवस्था नसल्याने रात्रीच्या वेळी मोबाईल टॉर्चच्या उजेडात अंत्यविधी पार पाडावे लागत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

तक्रारवाडी हे पुनर्वसित गाव असून गावाची स्मशानभूमी उजनी धरणाच्या पाणीफुगवठ्याजवळ, गावापासून सुमारे एक ते दीड किलोमीटर अंतरावर आहे. गेली अनेक दशके या ठिकाणी वीजपुरवठ्याची ठोस सोय करण्यात आलेली नाही. अनेक सरपंच सत्तेत आले आणि गेले; मात्र स्मशानभूमीतील अंधार दूर करण्यास प्राधान्य देण्यात आले नसल्याची ग्रामस्थांची तीव्र नाराजी आहे.

**सोलर हायमास्टही अपयशी**

काही वर्षांपूर्वी तात्पुरत्या उपाययोजनेतून सोलर हायमास्ट दिवे बसविण्यात आले होते. मात्र काही दिवसांतच ते बंद पडले. दुरुस्तीबाबत संबंधित ठेकेदाराने कोणतीही कार्यवाही न केल्याचा आरोप नागरिक करत आहेत. आजही हे दिवे निष्प्रभ अवस्थेत उभे असल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

नुकत्याच एका अंत्यविधीप्रसंगी राज्याचे मंत्री दत्तात्रय भरणे उपस्थित होते. मात्र स्मशानभूमीत दिवाबत्ती नसल्याने त्यांनाही काही अंतर मोबाईल टॉर्चच्या उजेडात चालावे लागले. मंत्री उपस्थित असतानाही अशी परिस्थिती निर्माण होणे ही गावासाठी लाजिरवाणी बाब असल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

स्मशानभूमीसारख्या संवेदनशील ठिकाणी वीज, रस्ता व पाण्यासारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी आहे. "गावाच्या वेदना समजून घेणारा आणि स्मशानभूमीला कायमस्वरूपी उजेड देणारा प्रतिनिधी हवा," अशी मागणी ग्रामस्थांकडून जोर धरत आहे. आता तरी संबंधित यंत्रणा जागी होणार का, हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

## चैतन्य विद्यालयात मोबाईलचा अतिवापर व व्यसनांविरोधात जनजागृती



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** ग्रामविकास मंडळ, ओतूर संचलित चैतन्य विद्यालय, ओतूर येथे मोबाईलचा अतिवापर आणि विविध व्यसनांचे दुष्परिणाम याबाबत जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. सुमन व्यसनमुक्ती व मानसिक आजार उपचार केंद्र, आळेफाटा येथील ऋषी साबळे व आदित्य डोईजड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना तज्ज्ञांनी सांगितले की, मोबाईलचा अतिरेक व विविध व्यसने मेंदू व मनावर घातक परिणाम करतात. त्यामुळे मनोविकार, चिडचिड, एकलकोंडेपणा वाढतो आणि व्यक्तिमत्व विकास खुंटतो. लहान वयातच अफू, गांजा, तंबाखूजन्य पदार्थ तसेच शीतपेये यांची सवय लागणे ही चिंताजनक बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. मोबाईलमुळे संवाद कमी होत असून वाचन संस्कृतीही लोप पावत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन करून गरजेनुसारच मोबाईलचा वापर करावा, सोशल मीडियापासून दूर राहावे, मैदानी खेळ खेळावेत, आई-वडिलांशी संवाद साधावा व संस्कारक्षम पुस्तकांचे वाचन करावे, असे आवाहन करण्यात आले. व्यसनांपासून स्वतः दूर राहून इतरांनाही परावृत्त करण्याचे आवाहनही करण्यात आले.

कार्यक्रमास ग्रामविकास मंडळाचे सचिव प्रदीप गाढवे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंचरी टोपीचा वारसा जपणारी शेवटची पिढी?

## आंबेगाव तालुक्यातील पारंपरिक पेहराव काळाच्या ओघात लुप्त होण्याच्या मार्गावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** धोतर-टोपी आणि नेहरू-पायजमा हा पेहराव म्हणजे ग्रामीण शेतकरी संस्कृतीची ओळख. उत्तर पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात तर डोक्यावरची पांढरी तिरकी 'मंचरी टोपी' ही खास ओळख मानली जाते. मात्र आधुनिक फॅशनच्या लाटेत हा पारंपरिक पेहराव आता दुर्मीळ होत चालल्याचे चित्र दिसत आहे.

पूर्वी ग्रामीण भागातील शेतकरी पांढरा सदरा, धोतर, कोपरी आणि टोपी परिधान करून दैनंदिन व्यवहार करत असत. आजही त्या पिढीतील काही ज्येष्ठ मंडळी हा पोशाख जपत आहेत; परंतु नव्या पिढीत पॅंट-शर्ट आणि आधुनिक कपड्यांचे प्रमाण वाढल्याने पारंपरिक वेषभूषा कालबाह्य ठरत असल्याची खंत व्यक्त केली जाते. शिरदाळे (ता. आंबेगाव) येथील गावच्या वेशीत अशाच आठ-दहा ज्येष्ठ मंडळी पारंपरिक वेशात एकत्र बसलेली दिसली. त्यांच्या डोक्यावरची पांढरी मंचरी टोपी आणि अंगावरील साधा पोशाख पाहून जुन्या ग्रामीण संस्कृतीची आठवण ताजी झाली. फोटो काढण्याची विनंती केल्यावर सर्वांनी हसतमुखाने प्रतिसाद दिला.

धावपळीच्या आधुनिक जीवनशैलीत अनेक जुन्या परंपरा लोप पावत आहेत. काही बदल अपरिहार्य असले तरी सांस्कृतिक ओळख जपण्याची गरज अधोरेखित होत आहे.

# किल्ले शिवनेरीवर स्वराज्य संग्रामची स्वच्छता मोहीम

## शिवजयंतीनंतर ४० गोण्या कचरा संकलित

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनंतर दुसऱ्याच दिवशी ऐतिहासिक वारशाच्या जतनासाठी स्वराज्य संग्रामच्या वतीने किल्ले शिवनेरी येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. गेली दहा वर्षे अखंडपणे ही परंपरा जपली जात असून, १९ फेब्रुवारीच्या शासकीय शिवजयंतीनंतर २० फेब्रुवारी रोजी संघटनेचे सदस्य किल्ल्यावर दाखल होतात.

शिवजयंती तसेच इतर दिवशी मोठ्या संख्येने पर्यटक शिवनेरीला भेट देतात. मात्र काहीजण प्लास्टिकच्या बाटल्या, खाऊच्या पुड्या, गुटख्याचे पाकिटे, तुटलेल्या चपला आदी कचरा टाकून जात असल्याने गडाचे पावित्र्य मलिन होत आहे. या पार्श्वभूमीवर सुमारे ४० गोण्या कचरा गोळा करून तो पायथ्यापर्यंत आणण्यात आला व पुढील विल्हेवाटीसाठी जुन्नर नगरपरिषदेकडे सुपूर्द करण्यात आला. अग्रण धुळगाव (सांगली) व पुणे येथून सकाळी लवकर सदस्य पायथ्याशी एकत्र जमले. विशेष म्हणजे लहान मुले व महिलांचा सहभाग लक्षणीय होता.

नवीन पिढीला केवळ इतिहास सांगण्यापेक्षा संवर्धनाची जाणीव देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. मोहिमेदरम्यान शिवशाहीर बाबासाहेब देशमुख यांच्या पोवाड्यांच्या सुरावटीत उत्साह दुणावला.

# ओझर येथे २८ फेब्रुवारीला शासकीय योजना व कायदेविषयक सेवांचा महामेळावा!

## दुर्गम भागातील नागरिकांना लाभ; उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींची उपस्थिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली २८ फेब्रुवारी रोजी श्री क्षेत्र ओझर विघ्नहर गणपती देवस्थान येथे शासकीय योजना व कायदेविषयक सेवांचा भव्य महामेळावा आयोजित करण्यात आला आहे.

हा उपक्रम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे, तालुका विधी सेवा समिती जुन्नर आणि तालुका बार असोसिएशन जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, (खेड) राजगुरुनगर व शिरूर तालुक्यातील आदिवासी, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, बांधकाम व

> ＋ दुर्गम भागातील नागरिकांना प्रत्यक्ष लाभ; उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींची विशेष उपस्थिती

उसतोड कामगार, महिला, मुले तसेच सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळावा हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

**नोंदणी, पडताळणी व तज्ज्ञांचे मार्गदर्शन**

महामेळाव्यात विविध शासकीय विभागांचे अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहून पात्र लाभार्थ्यांची नोंदणी, कागदपत्रांची पडताळणी आणि अर्ज प्रक्रिया सुलभ करणार आहेत. तसेच मोफत विधी सेवा, शासनाच्या विविध योजना, अनुदान, पेन्शन, विमा योजना आणि सामाजिक सुरक्षा योजनांची सविस्तर माहिती नागरिकांना दिली जाणार आहे. तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळणार असल्याने ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना एका ठिकाणी सर्व सेवा उपलब्ध होणार आहेत. जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती जुन्नर श्री. एस. बी. शेलार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे अधिकाधिक नागरिकांनी उपस्थित राहून योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. उच्च न्यायालयातील सन्माननीय न्यायमूर्तींच्या विशेष उपस्थितीमुळे या महामेळाव्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. दुर्गम व अतिदुर्गम भागातील जनतेसाठी विधी सेवेचे दरवाजे अधिक खुले होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## आजारी प्रकृतीतही दिलीप वळसे पाटील यांचा जनता दरबार

**मंचर :** आजारी प्रकृती असतानाही दिलीप वळसे पाटील यांनी पारगाव येथे जनता दरबार घेत नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. भिमाशंकर सहकारी साखर कारखाना परिसरात सकाळपासून नागरिकांनी विविध समस्या मांडल्या. विशेषतः ग्रामपंचायत कार्यालयात करार तत्वावर काम करणाऱ्या महिलांना मागील पाच-सहा महिन्यांपासून वेतन न मिळाल्याची गंभीर बाब पुढे आली. महिलांनी घरखर्च व मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज काढावे लागत असल्याचे सांगितले. वळसे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी तातडीने संपर्क साधून वेतनप्रश्नी लवकर निर्णय घेण्याच्या सूचना दिल्या. त्यांच्या या भूमिकेमुळे उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# जारकरवाडीतील आदर्श विद्यालयात 'बाल आनंद मेळावा' उत्साहात

## विद्यार्थ्यांच्या स्टॉलना उत्स्फूर्त प्रतिसाद; २० हजारांची उलाढाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील आदर्श विद्यालयात भरलेला 'बाल आनंद मेळावा'.

**लोणी-धामणी :** आदर्श माध्यमिक विद्यालय, जारकरवाडी येथे शनिवारी (दि. २१) 'बाल आनंद मेळावा' मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध खाद्यपदार्थांच्या स्टॉलमुळे विद्यालय परिसरात एकच गर्दी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

विद्यालयाच्या प्राचार्या शशिकला वाघमारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या मेळाव्याचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक ज्ञान, व्यवहारकौशल्य, नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास वाढवणे हा होता. खरेदी-विक्रीचा प्रत्यक्ष अनुभव घेताना विद्यार्थ्यांनी नफा-तोटा, व्यवहारातील गणिते तसेच ग्राहकांशी संवाद कसा साधावा याचे धडे आत्मसात केले. या उपक्रमात तीसहून अधिक विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल उभारले होते. फळे, पालेभाज्या, फळभाज्या, संतुलित आहार तसेच घरगुती खाद्यपदार्थ विक्रीस ठेवण्यात आले होते. पालकांसह परिसरातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

मेळाव्यात सुमारे २० हजार रुपयांची उलाढाल झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पालेभाज्यांचे भाव कोसळले; एकूण ६ कोटी ७० लाखांची उलाढाल

# चाकण बाजारात कांदा, हिरवी मिरची व गाजराची विक्रमी आवक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** चाकण, दि. २२ फेब्रुवारी २०२६ : खेड कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत महात्मा फुले मार्केटयार्ड, चाकण येथे रविवारी भाजीपाला व शेतीमालाची मोठ्या प्रमाणावर आवक झाली. कांदा, बटाटा, वाटाणा, गाजर आणि हिरवी मिरची यांची विक्रमी नोंद झाली असून बाजारात दिवसभर शेतकरी, व्यापारी व हमालांची लगबग पाहायला मिळाली. दिवसअखेर एकूण ६ कोटी ७० लाख रुपयांची उलाढाल झाली.

कांद्याची तब्बल ९ हजार क्विंटल आवक झाली. कांद्याला प्रतिक्विंटल कमाल १,५०० रुपये, तर सरासरी १,२०० ते १,००० रुपये दर मिळाला. बटाट्याची १,५०० क्विंटल आवक होऊन ८०० ते १,२०० रुपये भाव मिळाला. हिरव्या मिरचीची २८० क्विंटल आवक झाली असून तिला ६,००० ते ७,००० रुपये असा उच्च दर मिळाला. वाटाण्याची ३३० क्विंटल आणि गाजराची १७० क्विंटल आवक नोंदवली गेली.

फळभाज्यांमध्ये टोमॅटो (८००–१,०००), कोबी (४००–५००), फ्लॉवर (१,०००–१,२००), वांगी (२,०००–२,५००), भेंडी (३,०००–३,५००), दोडका (४,०००–४,५००), कारली (३,०००–३,५००), ढोबळी मिरची (३,०००–३,५००) आणि गवारला ७,००० ते ८,००० रुपये असा दर मिळाला.

पालेभाज्यांची मोठ्या प्रमाणावर आवक झाल्याने मेथीच्या १७,९९० जुड्या, कोथिंबिरीच्या ३४,३५० जुड्या आणि पालकाच्या ३,५२८ जुड्या बाजारात आल्या. भरघोस पुरवठ्यामुळे दरात घसरण झाली.

जनावरांच्या बाजारात ३५ जर्सी गाईंपैकी २८, ८५ बैलांपैकी ६०, ११० म्हशींपैकी ९५ आणि ९,६०० शेळ्यामेंढ्यांपैकी ८,८०० प्राण्यांची विक्री झाली. शेळ्यांना २,००० ते १५,००० रुपये दर मिळाला.

## काठापूर बु. येथे विजयी लोकप्रतिनिधींचा नागरी सत्कार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील काठापूर बु. येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व ग्रामस्थांच्या वतीने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत विजयी झालेल्या लोकप्रतिनिधींचा नागरी सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

पुणे जिल्हा परिषद सदस्यपदी दुसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल विवेक वळसे पाटील यांचा, तर आंबेगाव पंचायत समिती सदस्यपदी निवड झाल्याबद्दल कु. अंकिता वाळुंज यांचा ग्रामस्थांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. टाळ्यांच्या गजरात दोन्ही विजयी प्रतिनिधींना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमात वक्त्यांनी काठापूर बु. येथील कार्यकर्त्यांच्या संघटनबांधणीचे विशेष कौतुक केले. राज्याचे माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या प्रेरणादायी नेतृत्वामुळे गावातील कार्यकर्ते तळागाळात प्रभावीपणे काम करत असल्याचे नमूद करण्यात आले. तसेच माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील (अध्यक्ष, म्हाडा पुणे) यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील सामाजिक, शैक्षणिक व विकासात्मक कामे अधिक गतीने पूर्ण करण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

विवेक वळसे पाटील यांनी आपल्या मनोगतात गावाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन दिले.

सत्कार सोहळ्यास भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील, पुणे-नाशिक महामार्ग समन्वयक दिलीप मेदगे, पारगावच्या माजी उपसरपंच सुनंदा ढोबळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, महिला-भगिनी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साही वातावरणात पार पडला.

## सारांश वृत्त

### सीमापार शस्त्र तस्करी मॉड्यूलचा पर्दाफाश

**चंदीगड :** पंजाब पोलिस यांनी अमृतसर येथे सीमापार शस्त्रास्त्र तस्करी करणाऱ्या एका मॉड्यूलचा पर्दाफाश केला असून दोन संशयितांना अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून पाच अत्याधुनिक पिस्तुले जप्त करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी दिली. पोलिसांच्या प्राथमिक तपासात आरोपी पाकिस्तान मधील तस्करांच्या संपर्कात असल्याचे उघड झाले आहे. हे आरोपी बेकायदेशीर शस्त्रास्त्रांची वाहतूक करून ती पुढे गुन्हेगारी घटकांपर्यंत पोहोचवत होते. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

### ममता बॅनर्जींकडून नागरी पुरस्कार प्रदान

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या २५ मान्यवरांना राज्याचे नागरी पुरस्कार प्रदान केले. आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी प्रशस्तिपत्र आणि सन्मानचिन्ह प्रदान करताना पुरस्कारार्थींना शुभेच्छा दिल्या. "मी तुम्हाला माझा सर्वोच्च आदर व्यक्त करते आणि अभिनंदन करते," असे त्या म्हणाल्या. या पुरस्कारांद्वारे कला, साहित्य, संगीत आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला.

### ओडिशातील भाजी मार्केटमध्ये आग

**पारादीप:** ओडिशामधील पारादीप शहरातील भाजी मार्केटमध्ये लागलेल्या भीषण आगीत ५० हून अधिक दुकानांचे मोठे नुकसान झाले आहे, अशी माहिती अग्निशमन विभागाने दिली. शनिवारी रात्री उशिरा जगतसिंगपूर जिल्हा येथील बाजारपेठेत आग लागली. बांबू आणि प्लास्टिकच्या चादरींपासून उभारलेल्या तात्पुरत्या दुकानांमुळे आग झपाट्याने पसरली. अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आग नियंत्रणात आणली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती नाही.

## इंडिया एआय इम्पॅक्ट समिटचा यशस्वी समारोप

# नवी दिल्ली घोषणापत्रावर 88 देशांची स्वाक्षरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** भारताच्या अध्यक्षतेखाली पाच दिवस चाललेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिटचा शुक्रवारी यशस्वी समारोप झाला. अमेरिका, चीन, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया आणि युनायटेड किंग्डमसह ८८ देश व आंतरराष्ट्रीय संघटनांनी "नवी दिल्ली घोषणापत्र"ावर स्वाक्षरी केली. या घोषणेमुळे कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील जागतिक सहकार्याला नवे परिमाण मिळाले असून भारताच्या वाढत्या राजनैतिक प्रभावाचीही नोंद झाली आहे.

गेल्या वर्षी पॅरिसमध्ये झालेल्या एआय ॲक्शन समिटदरम्यान अमेरिका आणि ब्रिटनने युरोपियन नियामक दृष्टिकोनाचा दाखला देत सामूहिक घोषणेवर स्वाक्षरी करण्यास नकार दिला होता. मात्र नवी दिल्लीत भारताने विविध मतभेद दूर करत सर्व देशांना एकत्र आणण्यात यश मिळवले. भारताचे प्रमुख उद्दिष्ट एआयचे "लोकशाहीकरण" करणे असल्याचे अधिकृत सूत्रांनी सांगितले, म्हणजेच हे तंत्रज्ञान काही मोजक्या कंपन्या किंवा व्यक्तींपुरते मर्यादित राहू नये.

या घोषणेत स्वाक्षरी करणाऱ्या देशांनी अनेक स्वयंसेवी चौकटी आणि व्यासपीठ उभारण्यास सहमती दर्शवली आहे. "लोकशाही प्रसार चार्टर"द्वारे एआय पायाभूत सुविधांमध्ये सार्वत्रिक प्रवेश आणि स्थानिक नवोपक्रमांना चालना दिली जाईल. "ग्लोबल एआय इम्पॅक्ट कॉमन्स" या व्यासपीठाद्वारे विविध क्षेत्रांतील यशस्वी एआय अनुप्रयोगांचा अवलंब आणि पुनरुत्पादन सुलभ केले जाईल. "विश्वसनीय एआय कॉमन्स" अंतर्गत एआय प्रणालींची सुरक्षितता व विश्वासार्हता सुनिश्चित करण्यासाठी तांत्रिक साधने, बेंचमार्क आणि सर्वोत्तम पद्धतींचा सामायिक संच तयार केला जाईल. तसेच वैज्ञानिक संशोधनासाठी "विज्ञान संस्थांचे आंतरराष्ट्रीय एआय नेटवर्क" उभारण्याचेही ठरले आहे.

घोषणेत एआयमुळे समाजातील सर्व घटकांना सशक्त करण्याची क्षमता मान्य करण्यात आली आहे. त्यासाठी "सामाजिक सक्षमीकरण व्यासपीठ" उभारण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रोजगाराच्या बदलत्या स्वरूपाच्या पार्श्वभूमीवर पुनर्कौशल्य आणि कार्यबल विकासासाठी स्वयंसेवी मार्गदर्शक तत्त्वांवरही सहमती झाली आहे.

या उपक्रमाचे स्वरूप ऐच्छिक असल्याने अंमलबजावणी हेच सर्वात मोठे आव्हान ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, युरोपियन युनियन ने प्रारंभी घोषणेतील काही तरतुदींवर आक्षेप घेतला होता, कारण त्या संयुक्त राष्ट्रांच्या चौकटीसारख्या वाटत होत्या. मात्र भारताशी असलेले व्यापारी व धोरणात्मक संबंध लक्षात घेऊन अखेरीस त्यांनीही घोषणापत्रावर स्वाक्षरी केली.

## देशातील आणखी सहा विमानतळांवर डिजीयात्रा सुरू

### उडान यात्री कॅफे आणि फ्लायब्रेरीही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशातील आणखी सहा विमानतळांवर चेहऱ्याची ओळख पटवणारी 'डिजीयात्रा' प्रणाली सुरू करण्यात आली असून त्यामुळे हजारो प्रवाशांना संपर्करहित आणि सुलभ प्रवेशाचा लाभ मिळणार आहे.

गुरुवारी कोइम्बतूर आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू आणि राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आभासी पद्धतीने या फेस बायोमेट्रिक प्रणालीचे उद्घाटन केले. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, सुरत विमानतळ, श्री विजयपुरम विमानतळ, मंगळुरू आंतरराष्ट्रीय विमानतळ, तिरुवनंतपुरम आंतरराष्ट्रीय विमानतळ, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.

यापूर्वी मुंबई, कोलकाता, हैदराबाद, पुणे, विजयवाडा, कोची, अहमदाबाद, गुवाहाटी, जयपूर, विशाखापट्टणम, पाटणा, रायपूर, भुवनेश्वर, गोवा (दाबोली), इंदूर, रांची, कोइम्बतूर आणि बागडोगरा यांसह २४ विमानतळांवर डिजीयात्रा सुरू होती. आता या संख्येत वाढ झाली आहे. मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, नोव्हेंबर २०२५ पर्यंत डिजीयात्रा मोबाईल ॲपवरील नोंदणी १.९ कोटींवर पोहोचली आहे. २०२३ च्या अखेरीस हे प्रमाण ३८ लाख होते, त्यामुळे अल्पावधीतच मोठी वाढ नोंदवली गेली आहे.

दरम्यान, कोइम्बतूरसह सुरत, मुंबई, तिरुवनंतपुरम आणि मंगळुरू येथे 'उडान यात्री कॅफे'ची सुरुवात करण्यात आली. विमानतळांवरील महागड्या खाद्यपदार्थांच्या पार्श्वभूमीवर या कॅफेमुळे प्रवाशांना परवडणाऱ्या दरात सुविधा मिळणार आहे. पाच विमानतळांवर 'फ्लायब्रेरी'चीही सुरुवात झाली असून ही सुविधा असलेल्या विमानतळांची एकूण संख्या २१ झाली आहे.

## मतदारसंख्येत १.७० कोटींची घट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) अंतर्गत अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतर नऊ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील मतदारांची संख्या १.७० कोटींहून अधिक घटल्याची अधिकृत आकडेवारी समोर आली आहे. या प्रक्रियेमुळे निवडणूक व्यवस्थेवर पुन्हा एकदा लक्ष केंद्रीत झाले आहे.

गुजरात, पुद्दुचेरी, लक्षद्वीप, राजस्थान, छत्तीसगड, अंदमान आणि निकोबार बेटे, गोवा आणि केरळ येथील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी शनिवारी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, २७ ऑक्टोबर रोजी एसआयआर सुरू होण्यापूर्वी या राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील एकत्रित मतदारसंख्या २१.४५ कोटींहून अधिक होती. या आठवड्यात अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर ती १९.७५ कोटींवर आली असून एकूण १.७० कोटींहून अधिक मतदारांची निव्वळ घट नोंदवली गेली आहे. ही प्रक्रिया भारत निवडणूक आयोग यांच्या देखरेखीखाली राबवली जात आहे. बिहारमध्ये ही पुनरावृत्ती प्रक्रिया पूर्ण झाली असून सध्या ती १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरू आहे. या भागांत सुमारे ६० कोटी मतदारांचा समावेश होतो. उर्वरित ४० कोटी मतदारांना पुढील टप्प्यात १७ राज्ये आणि पाच केंद्रशासित प्रदेशांमध्ये समाविष्ट केले जाणार आहे. आसाममध्ये एसआयआरऐवजी "विशेष सुधारणा" मोहीम १० फेब्रुवारी रोजी पूर्ण करण्यात आली.

बिहारप्रमाणेच तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये काही राजकीय पक्षांनी यावर आक्षेप घेत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. एसआयआरच्या अंमलबजावणी, पारदर्शकता आणि मतदार वगळण्याच्या निकषांबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. या मुद्द्यावर कायदेशीर आणि राजकीय घडामोडी वाढण्याची शक्यता आहे.

## पाकिस्तानचे अफगाण सीमेवर हल्ले; तणावात वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इस्लामाबाद :** पाकिस्तानने रविवारी पहाटे अफगाणिस्तानच्या सीमेवर लक्ष्यित हल्ले केल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली. पाकिस्तानच्या मते, हे हल्ले अलीकडील दहशतवादी कारवायांसाठी जबाबदार असलेल्या दहशतवाद्यांच्या तळांवर करण्यात आले. मात्र नेमके कोणते भाग लक्ष्य करण्यात आले याबाबत इस्लामाबादने तपशील जाहीर केलेला नाही.

अफगाणिस्तानकडून या कारवाईवर तीव्र प्रतिक्रिया देण्यात आली आहे. तालिबान प्रशासनाचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या भूभागात घुसखोरी करून हल्ले केल्याचा आरोप केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, नांगरहार आणि पक्तिका प्रांतात नागरिकांना लक्ष्य करण्यात आले असून महिला आणि मुलांसह डझनभर लोक ठार आणि जखमी झाले आहेत. पाकिस्तान आपल्या अंतर्गत सुरक्षेतील कमकुवतपणा झाकण्यासाठी सीमापार कारवाया करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

दरम्यान, पाकिस्तानचे माहिती मंत्री अत्ताउल्लाह तरार यांनी ही कारवाई गुप्तचर माहितीच्या आधारे करण्यात आल्याचे सांगितले. त्यांनी सोशल मीडियावर लिहिताना, लष्कराने तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान आणि त्यांच्याशी संबंधित सात तळांवर निवडक कारवाई केली असल्याचे म्हटले. सीमावर्ती भागात इस्लामिक स्टेटच्या संलग्न गटालाही लक्ष्य करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

अलीकडेच खैबर पख्तूनख्वा प्रांतातील बाजौर जिल्ह्यात आत्मघातकी हल्ल्यात ११ सैनिक आणि एका मुलाचा मृत्यू झाला होता. त्यानंतर बन्नू जिल्ह्यात सुरक्षा काफिल्यावर झालेल्या हल्ल्यात लेफ्टनंट कर्नलसह दोन जवान ठार झाले. इस्लामाबादमधील शिया मशिदीवर झालेल्या आत्मघातकी स्फोटात ३१ जणांचा मृत्यू झाल्याची घटनाही ताजी असतानाच ही कारवाई करण्यात आली आहे.

पाकिस्तानकडून या हल्ल्यांसाठी अफगाणिस्तानातील सूत्रधार जबाबदार असल्याचा दावा करण्यात आला आहे. अफगाण तालिबान प्रशासनाने मात्र हे आरोप फेटाळले आहेत.

दोहा करारानुसार अफगाण भूमीचा वापर इतर देशांविरुद्ध होऊ नये, अशी जबाबदारी तालिबान सरकारवर असल्याचे सांगत पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय समुदायाकडे हस्तक्षेपाची मागणी केली आहे.

## दिल्लीत दहशतवादी कट प्रकरणी ८ जण अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** दिल्लीला लक्ष्य करून मोठा दहशतवादी कट रचल्याच्या आरोपाखाली आठ जणांना अटक करण्यात आली आहे. माध्यमांनी रविवारी याबाबत वृत्त दिले. तपास यंत्रणांना पाकिस्तानच्या आयएसआय तसेच बांगलादेशमधील अतिरेकी संघटनांशी संभाव्य संबंध असल्याचा संशय आहे.


पोलिसांच्या माहितीनुसार, तामिळनाडूतील विविध ठिकाणांहून सहा संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून पुढील चौकशीसाठी त्यांना दिल्लीला आणण्याची तयारी सुरू आहे. अटक केलेल्यांपैकी काही जण बांगलादेशी नागरिक असल्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. याच तपासाशी संबंधित कारवाईत यापूर्वी आणखी दोन जणांना अटक करण्यात आली होती. दिल्लीतील लाल किल्ला परिसरात संभाव्य स्फोटाबाबत गुप्तचर संस्थांनी अलर्ट जारी केल्यानंतर सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली. केंद्रीय गुप्तचर यंत्रणांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबा (एलईटी) भारतातील प्रमुख धार्मिक स्थळांना लक्ष्य करू शकते, असा इशारा देण्यात आला आहे.

तपास अधिकाऱ्यांनी सांगितले की, देशाच्या विविध भागांत विध्वंसक कारवाया करण्याच्या उद्देशाने एका संशयित मॉड्यूलची रचना करण्यात आली होती. प्राथमिक चौकशीत संशयितांचे पाकिस्तानच्या इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजेंसशी संबंधित हँडलर्स तसेच बांगलादेशातील काही अतिरेकी गटांशी संपर्क असल्याचे संकेत मिळाले आहेत. शोध मोहिमेदरम्यान डझनभर मोबाईल फोन आणि सिम कार्ड जप्त करण्यात आले असून, त्यांचे तांत्रिक विश्लेषण सुरू आहे.

### कोलकाता उच्च न्यायालयाने न्यायाधीशांच्या रजा रद्द

## एसआयआर प्रकरणांना वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या विशेष गहन पुनरावलोकन (एसआयआर) प्रक्रियेतील प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी कोलकाता उच्च न्यायालय यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. २१ फेब्रुवारी ते ९ मार्च या कालावधीत सर्व जिल्हा आणि सत्र न्यायाधीशांच्या रजा रद्द करण्यात आल्या आहेत. या काळात उच्च न्यायालयाची पूर्वपरवानगीशिवाय कोणतीही नवीन रजा मंजूर केली जाणार नाही. सध्या रजेवर असलेल्या न्यायाधीशांना तात्काळ हजर होण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मुख्य न्यायाधीश सुजॉय पाल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीनुसार, राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सत्र न्यायाधीश दररोज एसआयआरशी संबंधित दावे आणि आक्षेपांची सुनावणी करतील. सुमारे १५० सत्र न्यायाधीश या प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात, अशी माहिती सूत्रांनी दिली.

प्राथमिक टप्प्यात सात निवृत्त न्यायाधीशांची नावेही विचाराधीन असून आवश्यकतेनुसार त्यांची नियुक्ती केली जाऊ शकते. बैठकीला मुख्य निवडणूक अधिकारी मनोज कुमार अग्रवाल, अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी दिब्येंदु दास आणि अरिंदम नियोगी, निवडणूक आयोगाचे कायदा महासंचालक विजय पांडे, राज्याचे मुख्य सचिव, पोलिस महासंचालक, कोलकाता पोलिस आयुक्त, उच्च न्यायालयाचे रजिस्ट्रार जनरल आणि अतिरिक्त सॉलिसिटर जनरल उपस्थित होते.

निर्धारित कालावधीत इतर सर्व न्यायालयीन कामकाजांपेक्षा एसआयआर संबंधित प्रकरणांना प्राधान्य दिले जाईल, तसेच सुनावणीत कोणताही अडथळा येऊ नये यासाठी प्रशासकीय आणि लॉजिस्टिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाईल, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

या निर्णयाच्या एक दिवस आधी भारताचे सर्वोच्च न्यायालय यांनी एसआयआरच्या देखरेखीसाठी सेवारत किंवा निवृत्त अतिरिक्त जिल्हा न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचे निर्देश दिले होते. मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने राज्य सरकार आणि निवडणूक आयोग यांच्यातील विश्वासाच्या अभावाचा उल्लेख करत हा आदेश दिला.

येत्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये तणाव वाढला आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी एसआयआर प्रक्रियेवर आक्षेप घेत निवडणूक आयोगाशी संपर्क साधला असून या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयातही धाव घेतली आहे.

## भारताच्या विदेशी गंगाजळीचा नवा उच्चांक

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** देशाच्या विदेशी चलन साठ्याने पुन्हा एकदा विक्रमी पातळी गाठली आहे. १३ फेब्रुवारी रोजी संपलेल्या आठवड्यात साठ्यात ८.६६ अब्ज डॉलर्सची वाढ होऊन तो ७२५.७२७ अब्ज डॉलर्सवर पोहोचल्याची माहिती भारतीय रिझर्व्ह बँक यांनी जाहीर केली.

याआधी ६ फेब्रुवारी रोजी संपलेल्या आठवड्यात साठा ७१७.०६४ अब्ज डॉलर्सवर घसरला होता. जानेवारी महिन्यात तो ७२३.७७४ अब्ज डॉलर्स या त्या वेळच्या उच्चांकावर पोहोचला होता. ताज्या वाढीमुळे हा विक्रम मागे टाकण्यात आला आहे. १३ फेब्रुवारी रोजी संपलेल्या आठवड्यात परकीय चलन मालमत्ता ३.५५ अब्ज डॉलर्सने वाढून ५७३.६०३ अब्ज डॉलर्सवर पोहोचली. विदेशी चलन मालमत्ता हा साठ्याचा सर्वात मोठा घटक आहे. विनिमय दरातील चढउतार आणि मूल्यांकन परिणाम यांचा त्यावर परिणाम होतो. रिझर्व्ह बँकेच्या मते, सध्याचा विदेशी चलन साठा देशाच्या सुमारे ९६ टक्के आयातीसाठी आणि जवळपास एका वर्षासाठी थकीत बाह्य कर्जाची परतफेड करण्यासाठी पुरेसा आहे. गरज पडल्यास परकीय चलन बाजारात हस्तक्षेप करून रुपयातील तीव्र चढउतार नियंत्रित करण्यासाठी रिझर्व्ह बँक डॉलर्सची खरेदी-विक्री करते. हा हस्तक्षेप विशिष्ट दर निश्चित करण्यासाठी नसून बाजार स्थिर ठेवण्यासाठी केला जातो, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. विदेशी चलन साठ्याची आकडेवारी दर शुक्रवारी सायंकाळी जाहीर केली जाते. यात विदेशी चलन मालमत्ता, सोन्याचे साठे, विशेष रेखांकन हक्क आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमधील राखीव स्थिती यांची माहिती दिली जाते. आकडेवारी एका आठवड्याच्या विलंबाने प्रसिद्ध केली जाते.

गेल्या आठवड्यात घसरण झाल्यानंतर या आठवड्यात सोन्याच्या राखीव मूल्यात ४.९९ अब्ज डॉलर्सची वाढ होऊन ते १२८.४६६ अब्ज डॉलर्सवर पोहोचले. जागतिक बाजारातील सोन्याच्या किमतीतील बदल आणि मूल्यांकन परिणाम यामुळे या घटकात चढउतार होत असतात.

### किश्तवाडमध्ये चकमक

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरमधील किश्तवाड जिल्हा येथील दुर्गम जंगली भागात रविवारी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. दोन संशयित दहशतवाद्यांच्या हालचालींबाबत गुप्त माहिती मिळाल्यानंतर लष्कराच्या जवानांनी चतरू जंगल परिसरात शोधमोहीम सुरू केली. या दरम्यान दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केल्याने प्रत्युत्तरादाखल जवानांनीही कारवाई केली आणि चकमक सुरू झाली. या भागात अतिरिक्त सैन्य तातडीने पाठवण्यात आले आहे.

## मेघालयात बेकायदेशीर खाणकामाविरुद्ध कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिलाँग :** मेघालय राज्यातील बेकायदेशीर कोळसा खाणकाम आणि वाहतुकीविरुद्ध सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत पोलिसांनी पूर्व जैंतिया हिल्स जिल्हा येथे १७ हजार मेट्रिक टनांहून अधिक कोळसा आणि २५.५ किलो स्फोटक पदार्थ जप्त केले आहेत.

५ फेब्रुवारी रोजी थांगस्कू परिसरातील एका कोळसा खाणीत झालेल्या भीषण स्फोटात ३४ जणांचा मृत्यू झाला होता, तर अनेक जण जखमी झाले होते. या घटनेनंतर राज्यभरात बेकायदेशीर खाणकामांविरोधात पोलिसांनी व्यापक आणि कडक कारवाई सुरू केली आहे. पूर्व जैंतिया हिल्सचे पोलिस अधीक्षक पंकज कुमार रसगानिया यांनी सांगितले की, २० आणि २१ फेब्रुवारीच्या दरम्यान मध्यरात्री छापेमारी करण्यात आली. या कारवाईत खाणींमधून बेकायदेशीरपणे उत्खनन केलेला कोळसा आणि स्फोटक साहित्य जप्त करण्यात आले. या कारवाईदरम्यान कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. ५ फेब्रुवारीच्या स्फोटाच्या घटनेनंतर आतापर्यंत १४ एफआयआर नोंदवण्यात आले असून २२ जणांना अटक करण्यात आली आहे.

दरम्यान, राज्य सरकारने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन केले आहे. थांगस्कू कोळसा खाण स्फोटाच्या चौकशीसाठी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश आर. एस. चौहान यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय न्यायिक समिती नेमण्यात आली आहे.

### ऑनलाइन तिकीट बुकिंगमध्ये शॉर्टकट घेतल्यास आयडी ब्लॉक

## रेल्वेची आरक्षणासाठीची एआय प्रणाली सक्रिय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** ऑनलाइन रेल्वे तिकीट बुक करताना शॉर्टकट वापरणाऱ्यांवर आता कारवाई होणार आहे. बुकिंग प्रक्रिया अत्यंत कमी वेळेत पूर्ण केल्यास किंवा संशयास्पद हालचाली आढळल्यास इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन (आयआरसीटीसी) आयडी ब्लॉक केला जाऊ शकतो. नवीन तंत्रज्ञानाद्वारे तिकीट बुकिंगच्या गतीवरून कायदेशीर आणि बेकायदेशीर वापरकर्त्यांची ओळख पटवली जाणार आहे. या उपाययोजनांमुळे सामान्य प्रवाशांना कन्फर्म तिकिटे मिळण्याची शक्यता सुमारे ४० टक्क्यांपर्यंत वाढेल, असा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे.

रेल्वे बोर्डातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ऑनलाइन बुकिंग प्रक्रियेत दलालांकडून वापरल्या जाणाऱ्या बेकायदेशीर सॉफ्टवेअरला आळा घालण्यासाठी एआय-आधारित प्रीडेटर प्रणाली लागू करण्यात आली आहे. आयआरसीटीसीच्या वेबसाइटमध्ये घुसखोरी करून कन्फर्म तिकिटे मिळवण्याचे प्रकार रोखणे हा या प्रणालीचा उद्देश आहे.

एआय प्रणाली बुकिंगदरम्यान मानवी वापरकर्ता आणि सॉफ्टवेअर यांच्यातील फरक ओळखू शकते. तिकीट बुक करताना कट-अँड-पेस्टसारख्या युक्त्या वापरणाऱ्यांना सावध राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. अल्गोरिदम टायपिंगचा वेग मोजतो. पाच प्रवाशांची माहिती ४.२ सेकंदांपेक्षा कमी वेळेत भरल्यास खाते संशयास्पद म्हणून चिन्हांकित केले जाईल. तसेच एखाद्या आयडीने अर्ध्या तासात पाचपेक्षा जास्त वेळा लॉग-इन किंवा लॉग-आउट केल्यास खाते २४ तासांसाठी निलंबित केले जाईल. आयपी अॅड्रेस आणि मोबाईल क्रमांक एकाच प्रदेशात नसल्यास व्यवहार अडवला जाऊ शकतो. एका महिन्यात सुमारे २.८ लाख खाती ब्लॉक केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान, डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय रेल्वे कडून रेल वन ॲपद्वारे अनारक्षित तिकिटांवर ३ टक्के बोनस सवलतीचा विस्तार करण्यात आला आहे. ही योजना १४ जानेवारी २०२६ ते १४ जुलै २०२६ या कालावधीत प्रायोगिक तत्त्वावर लागू राहणार आहे. यापूर्वी ही सवलत केवळ आर-वॉलेटद्वारे देयक केल्यास उपलब्ध होती. आता यूपीआय, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंगसह सर्व मान्यताप्राप्त डिजिटल पेमेंट पद्धतींवर ३ टक्के सूट दिली जाणार आहे.

या निर्णयामुळे प्रवाशांना थेट आर्थिक बचत होईल आणि कॅशलेस व्यवहारांना चालना मिळेल. दैनंदिन आणि उपनगरीय प्रवाशांना याचा विशेष लाभ होणार आहे. रेल कनेक्ट किंवा यूटीएस ॲपचे वापरकर्ते प्ले स्टोअरवरून रेल वन ॲप डाउनलोड करून त्याच ओळखपत्राद्वारे लॉग-इन करू शकतात. या ॲपवर अनारक्षित व आरक्षित तिकिटे, प्लॅटफॉर्म तिकिटे, गाडी व स्थानकांची माहिती तसेच तक्रार निवारणाच्या सुविधा उपलब्ध आहेत.